# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः04.01.2025** **वारःशनिवार**

---

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी आज नवी दिल्लीत राष्ट्रीय ग्रामीण महोत्सवाचं उद्घाटन करणार.
2. परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉक्टर एस. जयशंकर आणि मालदीवचे परराष्ट्रमंत्री डॉ. अब्दुल्ला खलील यांच्यात नवी दिल्लीत द्विपक्षीय चर्चा.
3. लष्कर दिनाच्या पार्श्वभूमीवर पुण्यात Know Your Army मेळाव्याचं आयोजन
4. अमेरिकेत माइक जॉन्सन यांची काठावरच्या मतांनी सभापतिपदी फेरनिवड आणि
5. बॉर्डर गावस्कर करंडक कसोटी मालिकेत पाचव्या सामन्यात भारतानंतर ऑस्ट्रेलियाचीही अडखळत सुरूवात.

**<u>पंतप्रधान ग्रामीण महोत्सव</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज नवी दिल्लीत राष्ट्रीय ग्रामीण महोत्सवाचं उद्घाटन करणार आहेत. पंतप्रधान या प्रसंगी संबोधितही करणार आहेत. ग्रामीण पायाभूत सुविधा वाढवणं, आत्मनिर्भर अर्थव्यवस्था तयार करणं आणि ग्रामीण भागात नावीन्याला बळ देणं हा महोत्सवाचा उद्देश आहे. या महोत्सवात वेगवेगळी प्रदर्शनं आणि सादरीकरणांच्या माध्यमातून भारताचा समृद्ध सांस्कृतिक वारसा अधोरेखित केला जाईल. सहा दिवस चालणाऱ्या या महोत्सवाची संकल्पना 2047 च्या विकसित भारतासाठी सक्षम ग्रामीण भारताची बांधणी करणं अशी आहे.

**<u>भारत-मालदिव चर्चा</u>**

परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉक्टर एस. जयशंकर आणि मालदीवचे परराष्ट्रमंत्री डॉ. अब्दुल्ला खलील यांच्यात काल नवी दिल्लीत द्विपक्षीय चर्चा झाली. भारतासाठी मालदिवबरोबरचे द्विपक्षीय संबंध महत्त्वाचे आहेत असं जयशंकर यांनी स्पष्ट केलं आणि शेजारी प्रथम या धोरणानुसार भारताचा मालदिवला पाठिंबा कायम राहील अशी ग्वाही दिली. मालदिवचे अध्यक्ष डॉक्टर मोहम्मद मुइझ्झू यांच्या गेल्या वर्षीच्या भारत भेटीत झालेल्या करारांचा आणि मुद्द्यांचा उभय मंत्र्यांनी आढावा घेतला. मालदिवला गरज असताना भारतानं केलेल्या मदतीबद्दल खलील यांनी भारताचे आभार मानले. मुइझ्झू सरकार दोन्ही देशांमधली भागिदारी बळकट करण्यासाठी कटिबद्ध आहे असंही त्यांनी स्पष्ट केलं.

**Know Your Army**

भारतीय सेना ही जगातील सर्वोत्तम सेनांपैकी एक सेना आहे. कोणत्याही प्रकारचा हल्ला सेना परतवून लावू शकते, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल पुण्यात व्यक्त केला. 15 जानेवारी रोजी पुण्यात साजऱ्या होणाऱ्या लष्कर दिनाच्या पार्श्वभूमीवर Know Your Army मेळाव्याचं उद्घाटन करताना ते बोलत होते. लष्कराच्या दक्षिण विभागाचे प्रमुख लेफ्टनंट जनरल धीरज सेठ, खासदार मेधा कुलकर्णी आदी मान्यवर याप्रसंगी उपस्थित होते. भारतीय लष्कर दिनानिमित्त होणारा भव्य संचलन सोहळा यंदा 15जानेवारी रोजी पुण्यात होणार आहे. हा सोहळा पुण्यातील बॉम्बे इंजिनिअरिंग ग्रुपच्या मैदानावर होणार आहे. यानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या Know Your Army या प्रदर्शनात भारतीय लष्कराची सक्षमता दर्शवण्यात आली आहे. भारतीय लष्करात वापरली जाणारी भारतीय बनावटीची अत्याधुनिक उपकरणं, पिनका रॉकेट यंत्रणा, धनुष आणि बोफोर्स तोफा, रशियन बनावटीचा टी 90 रणगाडा, चिलखती वाहनं, आकाश क्षेपणास्त्र, विविध प्रकारचे ड्रोन आदी शस्त्र सामग्री प्रदर्शनात ठेवण्यात आली आहे.

**ग्रामविकास मंत्री**

गावांना गरिबीमुक्त करण्यासाठी ग्रामविकास मंत्रालय कटिबद्ध आहे असं ग्रामीण विकास मंत्री शिवराजसिंह चौहान यांनी म्हटलं आहे. विविध राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांच्या ग्रामविकासमंत्र्यांबरोबर काल नवी दिल्लीत झालेल्या आढावा बैठकीत चौहान बोलत होते. राष्ट्रउभारणीत गावांचं महत्त्व चौहान यांनी अधोरेखित केलं. ग्रामविकास मंत्रालयाच्या विविध योजना सर्वसामान्य नागरिकांसाठी आशेचा कारण असून त्यांची स्वप्नं पूर्ण करण्याचंही ते एक साधन असल्याचं चौहान यांनी नमूद केलं. गावांच्या विकासाबाबतची केंद्र सरकारची कटिबद्धता या योजनांमधून अधोरेखित होते, असंही ते म्हणाले.

**आयुष नड्डा**

आयुष यंत्रणेचा आधुनिक वैद्यकशास्त्राशी मिलाफ करण्याचा धोरणात्मक बदल करण्यात आल्याचं केंद्रीय आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्री जे. पी. नड्डा यांनी म्हटलं आहे. बेंगळुरूत काल स्वामी विवेकानंद योगसंशोधन संस्थेच्या आधुनिक अभ्यास केंद्राच्या नवीन आवाराचं उद्घाटन त्यांच्या हस्ते झालं, त्या प्रसंगी ते बोलत होते. जिथं गरज वाटेल तिथं आधुनिक वैद्यकशास्त्र उपचारपद्धतीचे डॉक्टर आयुष उपचारांची चाचपणी करतील, असं नड्डा म्हणाले. एम्सच्या 22 रुग्णालयांना आयुष प्रणाली जोडल्याचं त्यांनी स्पष्ट केलं.

**अमेरिका जॉन्सन निवड**

अमेरिकेत डोनाल्ड ट्रंप यांचा पाठिंबा असलेले माइक जॉन्सन यांची संसदेत सभापती म्हणून फेरनिवड झाली आहे. तीन रिपब्लिकन सदस्यांनी त्यांच्याविरुद्ध मतदान केलं होतं, मात्र ऐन वेळी त्यांनी त्यांचं मत बदलल्यामुळे जॉन्सन यांची निवड होऊ शकली. जॉन्सन यांना 218, तर डेमोक्रॅट पक्षाचे हकीम

जेफ्रीस यांना 215 मतं मिळाली आहेत. जॉन्सन यांना काठावरची मतं मिळाल्यामुळे सभागृह चालवणं त्यांच्यासाठी आव्हानाचं असणार आहे.

**<u>चीनफ्लू</u>**

चीनमध्ये फ्लूचा मोठ्या प्रमाणात उद्रेक झाल्याचं वृत्त चीननं फेटाळलं आहे. हिवाळ्यात होणाऱ्या श्वसनाच्या आजारांचे रुग्ण गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा कमी आहेत असं चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते माओ निंग यांनी काल प्रसारमाध्यमांना सांगितलं. परदेशी नागरिकांसाठीही चीनमधील प्रवास सुरक्षित असल्याचंही परराष्ट्र मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<u>सावित्रीबाई फुले जयंती</u>**

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची 194वी जयंती काल राज्यात विविध उपक्रमांद्वारे साजरी करण्यात आली. सातारा जिल्ह्यातल्या नायगांव या सावित्रीबाईंच्या जन्मगावी आयोजित कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह राज्यातले अन्य मंत्री आणि मान्यवर उपस्थित होते. सावित्रीबाई फुले यांच्या सन्मानाला साजेशा भव्य स्मारकासाठी निधीची कमतरता पडू देणार नाही अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली.

**<u>हवा आयोग</u>**

हवा गुणवत्ता व्यवस्थापन आयोगानं दिल्ली आणि राष्ट्रीय राजधानी प्रदेश म्हणजे एनसीआर भागासाठी टप्याटप्प्यानं कार्यवाही करण्यासाठीच्या कृती आराखड्याचा म्हणजे ग्रॅपचा तिसरा टप्पा लागू केला आहे. त्याची अंमलबजावणी तातडीनं सुरू होणार आहे. हवेच्या गुणवत्तेची आणखी हानी रोखण्यासाठी ही पाऊलं उचलण्यात आली आहेत. या भागात आता आवश्यक नसलेली बांधकामं आणि रस्तेनिर्माण कामांवर बंदी घालण्यात आली आहे. दिल्ली, तसंच गुरुग्राम, फरिदाबाद, गाझियाबाद आणि गौतमबुद्ध नगर या जिल्ह्यांमध्ये पेट्रोलची बीएस-तीन वाहनं आणि डिझेलची बीएस-चार वाहनं यांच्यावर बंदी घालण्यात आली आहे.

**<u>थंडीलाट</u>**

दरम्यान, कडाक्याची थंडी आणि दाट धुक्यामुळे उत्तर भारतातील विविध भागात जनजीवन विस्कळीत झालं आहे. दिल्ली, उत्तर प्रदेश आणि हरियाणातील रस्ते वाहतूक संथ गतीने सुरू असून प्रवाशांना दाट धुक्यातून मार्ग काढावा लागत आहे. दाट धुक्यामुळे दिल्ली विमानतळावरील विमानसेवाही काही अंशी विस्कळीत झाली आहे. दिल्ली इंटरनॅशनल एअरपोर्ट लिमिटेडनं समाजमाध्यमावरील संदेशाद्वारे प्रवाशांना विमानाच्या अद्ययावत माहितीसाठी विमान कंपन्यांशी संपर्क साधण्याचं आवाहन केलं आहे. पुढील दोन दिवस वायव्य आणि मध्य भारतातील काही भागांत दाट धुकं आणि थंडीचा कडाका कायम राहील असा अंदाज भारतीय हवामान शास्त्र विभागानं वर्तवला आहे. पंजाब, हरियाणा, चंदीगड आणि दिल्ली

आणि उत्तर प्रदेशच्या काही भागात पुढील दोन दिवसात दाट धुक्याची शक्यता आहे तर जम्मू-काश्मीर, लडाख, गिलगिट, बाल्टिस्तान आणि मुजफ्फराबाद मध्ये मुसळधार पाऊस आणि बर्फवृष्टीचा अंदाज आहे.

**<u>पंतप्रधान कोनेरू हंपी</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल बुद्धिबळपटू कोनेरू हंपी आणि तिच्या कुटुंबीयांची नवी दिल्लीत भेट घेतली. कोनेरू क्रीडाविषयक प्रेरणास्थान आहे आणि उदयोन्मुख खेळाडूंना ती प्रेरणा देत आहे, असं पंतप्रधानांनी समाजमाध्यमांवरील आपल्या संदेशात म्हटलं आहे. कोनेरूची हुकमत आणि तिची निष्ठा सहजपणे दिसते, असंही त्यांनी स्पष्ट केलं आहे. कोनेरू महिलांच्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत द्वितीय आहे आणि जलद बुद्धिबळ स्पर्धेत दोन वेळा जागतिक विजेती ठरली आहे.

**<u>क्रिकेट</u>**

बॉर्डर गावस्कर करंडक कसोटी क्रिकेट मालिकेतल्या पाचव्या आणि अखेरच्या निर्णायक सामन्यात ऑस्ट्रेलियाच्या पहिल्या डावात आतापर्यंत 6 गडी बाद 137 धावा झाल्या आहेत. तत्पूर्वी काल सामन्याच्या पहिल्या दिवशी भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. भारताचा पहिला डाव 185 धावांवर संपुष्टात आला. भारतातर्फे रिषभ पंतनं सर्वाधिक 40 धावा केल्या. जसप्रीत बूमरानं 22 तर रवींद्र जडेजानं 26 धावा केल्या. ऑस्ट्रेलियाच्या स्कॉट बोलंडनं 4 बळी घेतले.

मेलबर्न इथं झालेल्या चौथ्या कसोटीत ऑस्ट्रेलियानं भारतावर 184 धावांनी विजय मिळवून मालिकेत 2-1 अशी विजयी आघाडी घेतली आहे. भारतीय संघासमोर बॉर्डर-गावस्कर करंडकावरील आपली पकड कायम राखण्याचं आणि जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम फेरीत स्थान मिळविण्यासाठी, हा अंतिम सामना जिंकण्याचं आव्हान आहे.

**<u>जगबिरसिंग झटका</u>**

माजी हॉकीपटू आणि प्रशिक्षक जगबिरसिंग यांना काल हृदयविकाराचा झटका आला. संघाच्या सरावादरम्यान त्यांना छातीत दुखू लागल्यामुळे राऊरकेला इथल्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. तिथं त्यांना झटका आला. सध्या सुरू असलेल्या हॉकी इंडिया लीगमध्ये ते टीम गोनासि  काशी निगडित आहेत. त्यांच्यावर सध्या अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.